आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक १९ मे २०२५

**ठळक बातम्या**

1. शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या २९ मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरु होणार.
2. उच्च न्यायालयातल्या अतिरिक्त न्यायाधीशांनाही इतर न्यायाधीशांप्रमाणेच पूर्ण निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्तीचे इतर लाभ मिळाले पाहिजेत असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा.
3. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूरच्या पाणीपुरवठा आणि नागनदी प्रकल्पासह विविध कामांचा घेतला आढावा.
4. आज, उद्या यांनी परवा विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात पावसाची शक्यता.

---------------------------------------------------

**कृषी संकल्प अभियान**

शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या २९ मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरु होणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशातल्या ७२३ जिल्ह्यांमधे ही मोहीम राबवण्यात येणार असून सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्याचं उद्दिष्ट आहे. सुमारे ६५ हजार गावात जाऊन वैज्ञानिकांचं पथक शेतकऱ्यांना यासंदर्भात प्रात्यक्षिकं आणि प्रशिक्षण देईल. जिल्हा पातळीवर या पथकाच्या दररोज तीन बैठका होतील असं त्यांनी सांगितलं....

*(होल्ड बाईट- शिवराज सिंह चौहान २२ सेकंद)*

*इस अभियान में हम 2 हजार 170 टीमें बना रहे हैं वैज्ञानिको की, इसमें कम से कम चार साइंटिस्ट एक टीम में होंगे। इन वैज्ञानिक के साथ जोड़ेंगे हम यूनिवर्सिटीज़ को, कॉलेजेस को, राज्य सरकार के अमले को, केंद्र की पूरे कृषि विभाग की टीम को, प्रगतिशील किसानों को, एफ.पी.ओ. को और ये टीम एक*

*जिले में तीन टीमें जाएगी । हर एक टीम जीस एक गांव में जाएगी वहाँ पांच से लेके दस  गांव के किसान यहां आएँगे।*

**शेती क्षेत्रामुळे सुमारे निम्म्या लोकसंख्येला रोजगार मिळतो, आणि अन्नसुरक्षेचा पाया घातला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेत, 'विकसित कृषी- समृद्ध किसान' असं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले. २०२३-२०२४ या वर्षात एकूण अन्नधान्य उत्पादन ५५७ लाख टन झालं ते २०२४--२५ या वर्षात एक हजार ६६४ लाख टनांपर्यंत गेल्याची माहिती त्यांनी दिली.**

**-----------------------------------------------**

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी**

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी-**IMF **नं आपल्या अर्थसहाय्य योजनेच्या पुढील टप्प्यासाठी पाकिस्तानवर अकरा नवीन अटी लादल्या आहेत. या नवीन अटींमुळे,** IMF **नं पाकिस्तानवर लादलेल्या अटींची एकूण संख्या ५० वर गेली आहे. पाकिस्तानच्या भारताबरोबरच्या तणावपूर्ण संबंधांमुळे योजनेच्या आर्थिक, परराष्ट्र आणि सुधारणा विषयक उद्दिष्टांना धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. नवीन अटींमध्ये १७ हजार ६०० अब्ज रुपयांच्या नवीन अर्थसंकल्पाला संसदीय मान्यता, वीज बिलांवर कर्ज सेवा अधिभारात वाढ आणि तीन वर्षांपेक्षा जास्त वापर झालेल्या जुन्या कारच्या आयातीवरचे निर्बंध उठवणं, यांचा समावेश आहे.**

**-----------------------------------------------**

**इस्रो**

**भारतीय अंतराळ संशोधन संस्था-इस्रोनं काल ईओएस-झिरो नाईन या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचं प्रक्षेपण केलं, मात्र उड्डाणाच्या तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाडामुळे ही मोहीम अयशस्वी झाल्याचं, इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी सांगितलं.....**

***(होल्ड बाईट - व्ही.नारायणन १४ सेकंद)***

*The PXL is a **4** stage vehicle. Up to the second stage, the performance was quite normal. **3**rd stage motor started perfectly. But during the functioning of the **3**rd stage we are seeing an observation and the mission could not be accomplished. After analysis, we shall come back.*

**-----------------------------------------------**

**पूर्ण निवृत्तीवेतन**

उच्च न्यायालयातल्या अतिरिक्त न्यायाधीशांनाही इतर न्यायाधीशांप्रमाणेच पूर्ण निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्तीचे इतर लाभ मिळाले पाहीजेत असा निवाडा सर्वेच्च न्यायालयाने आज दिला. न्यायाधीशाच्या नेमणुकीची तारीख आणि त्यांच्या पदावरुन भेदभाव करणं संविधानाच्या १४व्या कलमाअंतर्गत समानतेच्या हक्काची पायमल्ली ठरेल, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठाने सांगितलं. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून निवृत्त झालेल्या न्यायमूर्तींना वार्षिक १५ लाख रुपये निवृत्तीवेतन मिळेल, तसंच अतिरिक्त न्यायाधीश म्हणून सेवानिवृत्त झालेल्या दिवंगत न्यायमूर्तींच्या कुटुंबांनाही निवृत्तीवेतन आणि इतर लाभ मिळाले पाहिजेत, असं न्यायालयाने सांगितलं.

-----------------------------------------------

तिरंगा यात्रा

देशाच्या सुरक्षेसाठी प्राण पणाला लावून भूदल, नौदल आणि वायुसेनेतील जवान सेवा करतात. देशावर कुठल्याही आतंकवादी दृष्ट प्रवृत्तींना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी आपले जवान सदैव सज्ज असतात. या जवानांच्या समर्पित सेवेमुळेच देश सुरक्षित आहे, असे गौरवोद्गार राज्याचे माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी काढले. 'मिशन सिंदूर'च्या यशानंतर भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ बल्लारपूर शहरात सात किलोमिटर लांब तिरंगा यात्रा बल्लारपूर विधानसभेचे आमदार आणि भाजप नेते सुधीर मुनगंटीवार, जिल्हातील माझी सैनिक यांच्या नेतृत्वात काल काढण्यात आली .

-----------------------------------------------

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

नागपूर शहरातील पाणी पुरवठा यंत्रणेमध्ये ओसीडब्ल्यूने एक महिन्याच्या आत सुधारणा करावी. अन्यथा कारवाई करण्यात येईल, या शब्दांत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांना बजावले. त्याचवेळी नागपूर महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीवरही गडकरी यांनी नाराजी व्यक्त केली. महानगरपालिकेच्या सभागृहात गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाणीपुरवठा आणि नागनदी प्रकल्पासह विविध कामांचा आढावा घेतला. नागपूर शहरात मुबलक पाणी येत असतानाही नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा होत नाही, अशा तक्रारी लोकप्रतिनिधींनी केल्या होत्या. त्यासंदर्भात दोन आठवड्यांपूर्वी गडकरी यांच्या निवासस्थानी बैठक झाली होती. या नागनदी

प्रकल्पाच्या संदर्भात सरकारच्या आदेशांनुसार सर्वेक्षण करावे आणि तीन महिन्यांच्या आत निविदा काढाव्या, अशा सूचना देखील गडकरी यांनी कंपनीला दिल्या.

-----------------------------------------------

हवामान

येत्या काही तासात अकोला, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांतील काही भागांमध्ये विजा आणि वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. आज उद्या आणि परवा विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसासह वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने जारी केला आहे. यादरम्यान मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा आणि तुरळक ठिकाणी पर्जन्यवृष्टी होऊ शकते. दरम्यान, चंद्रपूर जिल्ह्यात सर्वाधिक कमाल तापमान 41 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर नागपुरात 40 पूर्णांक आठ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली.

-----------------------------------------------

आयपीएल प्लेऑफ

आयपीएल च्या काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्जच्या विजयामुळे दोन्ही संघांना प्लेऑफचं तिकीट मिळालं, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनंही अंतिम चार संघांमध्ये स्थान मिळवलं आहे. शनिवारी बेंगळुरूमध्ये पावसामुळे सामना रद्द झाल्यानं गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सचा संघ स्पर्धेतून बाद झाला. आता एका प्लेऑफ स्थानासाठी मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात चुरस आहे. उर्वरित दोन्ही सामने जिंकले तर, पंजाब किंग्ज टॉप-२ च्या शर्यतीत टिकून राहील.

-----------------------------------------------

बीसीसीआय

भारत आणि पाकिस्तानमधील तणावानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ-बीसीसीआयनं आशियाई क्रिकेट परिषदेच्या दोन प्रमुख स्पर्धांमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये पुढील महिन्यात श्रीलंकेत होणारी महिला इमर्जिंग टीम आशिया कप आणि यंदाच्या सप्टेंबर महिन्यात भारतात होणाऱ्या पुरुषांच्या आशिया कप स्पर्धांचा यात समावेश आहे.

-----------------------------------------------

**परिवहन मंत्री सरनाईक**

**मोटार परिवहन विभागाच्या ऑनलाईन बदल्यामुळे पारदर्शकते बरोबरच जास्तीत जास्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मागणी केलेला पसंतीक्रम मिळत असल्याने बहुतेक अधिकाऱ्यांचे समाधान होते.त्यामुळे भविष्यात परिवहन विभागाच्या ऑनलाईन बदल्यांमध्ये अधिक सुसूत्रता आणावी, तसेच महिला अधिकारी वर्गाच्या अडचणी प्राधान्याने विचारात घ्याव्यात असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज दिले. परिवहन मंत्री सरनाईक यांच्या उपस्थितीत आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात परिवहन विभागाकडील १५९ मोटार वाहन निरीक्षकांच्या (**IMV**) ऑन लाईन बदल्या करण्यात आल्या.ऑनलाइन बदल्या करतांना अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या विशेषतः महिलांच्या समस्या जाणून घेऊन त्या दूर करण्यास प्राधान्य द्यावे. भविष्यात अधिकाऱ्यांना ३ ऐवजी ५ पसंती क्रम दिल्यास ऑन लाईन बदल्यांमुळे जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना पसंतीचे ठिकाण मिळण्यास मदत होईल. पुढील वर्षापासून ऑन लाईन बदली प्रक्रिया अधिक चांगल्या पद्धतीने राबवावी. असे ते म्हणाले.**

---

**ऑनलाईन प्रवेश**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयानं शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरण्याचा सराव करण्यासाठी नोंदणी आणि महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची संधी मिळेल. २० मे रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हे सराव अर्ज उपलब्ध असतील. प्रवेशासाठी अंतिम अर्ज २१मे ते २८ मे या कालावधीत भरता येतील.**

---